506

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व.का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक १६/०१/२०२५

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,गृह विभाग, निर्णय क्र. न्याचौस - ०१२५/प्र.क्र.०२/विशा-१अ, दि. १५/०१/२०२५.

**विषय :-** परभणी येथील हिंसाचार प्रकरणाची तसेच स्व. श्री. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी न्यायालयीन चौकशी समिती गठित करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. न्याचौस - ०१२५/प्र.क्र.०२/विशा-१अ, दि. १५/०१/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०११५१९२४५७३१२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य,मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु.),महाराष्ट्र राज्य,मुंबई
कार्यासन अधिकारी, का.क्र.२४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

परभणी येथील हिंसाचार प्रकरणाची तसेच स्व. श्री. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी न्यायालयीन चौकशी समिती गठित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: न्याचौस-०१२५/प्र.क्र.०२/विशा-१अ,**
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
२ रा मजला, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : १५ जानेवारी, २०२५

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२४ च्या हिवाळी अधिवेशनात मा. विधानसभा सदस्यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेस उत्तर देताना मा. मुख्यमंत्री यांनी सभागृहात आश्वासित केल्यानुसार दि. १० डिसेंबर, २०२४ रोजी परभणी येथील भारतीय संविधान प्रतिकृतीच्या विटंबनेच्या अनुषंगाने उसळलेल्या हिंसाचार प्रकरणाची तसेच स्व. श्री. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी न्यायालयीन चौकशी समिती गठीत करण्याची बाब शासन विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

दि. १० डिसेंबर, २०२४ रोजी परभणी येथील भारतीय संविधान प्रतिकृतीच्या विटंबनेच्या अनुषंगाने उसळलेल्या हिंसाचार प्रकरणाची तसेच कोठडीत असलेल्या स्व. श्री. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या दि. १५.१२.२०२४ रोजीच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी न्यायालयीन चौकशी करण्यासाठी **सेवानिवृत्त न्यायाधीश मा. व्ही. एल. आचलिया** यांच्या अध्यक्षतेखाली “एक सदस्यीय चौकशी समिती” गठीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर न्यायालयीन चौकशी समितीसाठी **संदर्भ अटी** (The Terms of Reference/ToR) खालीलप्रमाणे असतील :-

(अ) दि. १० डिसेंबर, २०२४ रोजी परभणी येथील भारतीय संविधान प्रतिकृतीच्या विटंबनेच्या अनुषंगाने उसळलेल्या हिंसाचार प्रकरणातील तसेच स्व. श्री. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणातील घडलेल्या घटनांचा क्रम, त्याची कारणे व परिणाम याचा अभ्यास करणे.

(आ) या घटनेसाठी कोणतीही व्यक्ती किंवा संस्था प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार होती का याची तपासणी करणे.

(इ) कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि पोलीस यंत्रणेने केलेले नियोजन आणि तयारीची पर्याप्तता (Adequacy) पुरेशी होती किंवा कसे ?

(ई) उपरोक्त परिस्थिती हाताळण्यासाठी पोलिसांनी उचललेली पावले योग्य होती का याची तपासणी करणे.

(उ) उपरोक्त अट (आ), (इ) आणि (ई) संदर्भात जबाबदारी निश्चित करणे.

(ऊ) अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि पोलिसांनी करावयाच्या अल्पकालीन आणि दीर्घकालीन कायमस्वरुपी उपाययोजना सुचवणे.

(ए) सदर प्रासंगिक दुर्घटनेशी संबंधित इतर कोणतीही महत्त्वाची सूचना करणे.

Scanned with CamScanner

३. सदर न्यायालयीन चौकशी समितीस खालील **अतिरिक्त अधिकार** असतील :-

१.सदर प्रासंगिक दुर्घटनेशी संबंधित माहिती मिळविण्यासाठी चौकशी समिती कोणत्याही व्यक्तीला चौकशीसाठी बोलाविण्याचा अधिकार राहिल.

२. कोणत्याही इमारतीत /जागेत प्रवेश करण्याचा अधिकार किंवा त्यासाठी कोणालाही प्राधिकृत करण्याचा अधिकार आणि कोणतेही संशयित दस्ताऐवज, खाते किंवा कागदपत्रे इ. जप्त करण्याचा अधिकार राहिल

३. समितीसमोरील कार्यवाही ही न्यायालयीन स्वरुपाची कार्यवाही राहील.

४. चौकशी समितीचे मुख्यालय परभणी येथे राहील. चौकशी समिती स्वत: च्या कार्यपद्धतीचे नियमन करेल. चौकशी समिती या दुर्घटनेची चौकशी करुन आपला चौकशी अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह सदरहू शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या तारखेपासून तीन ते सहा महिन्यांच्या आत शासनास सादर करेल.

५. चौकशी समितीच्या कामकाजाकरीता कार्यालय तसेच आवश्यक मनुष्यबळ, कार्यालयीन सामुग्री, संगणकीय सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच चौकशी समितीच्या अध्यक्षांचे मानधन व भत्ते यांचे निर्धारण करणे, त्यांना वाहन व अनुषांगिक सुविधा उपलब्ध करुन देणे त्यास प्रशासकीय मान्यता तसेच याबाबतच्या संबंधित खर्चासंदर्भातील आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२५०११५१९२४५७३१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

HEMANT ANANT MAHAJAN

Digitally signed by HEMANT ANANT MAHAJAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=18b72890e049ba3219e993bae40e4fea87fba16fd8c92cbf7f96107d9c100ae1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4146B85AAA5B555EB0C9D75A2ABA23B993E46DF208B08469F1B74670DC22D7FA, cn=HEMANT ANANT MAHAJAN
Date: 2025.01.15 19:25:50 +05'30'

**( हेमंत महाजन )**

**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव.

२) मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव.

३) मा. उप मुख्यमंत्री (अर्थ व नियोजन) यांचे प्रधान सचिव.

४) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास व इतर) यांचे प्रधान सचिव.

५) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

६) सर्व सन्माननीय संसद, विधानसभा, विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य.

७) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक

८) मा. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक

९) मा. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक

१०) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

११) सेवानिवृत्त न्यायाधीश तथा न्यायालयीन चौकशी समिती अध्यक्ष मा. व्ही. एल. आचलिया.

१२) निवड नस्ती (विशा-१अ)



Scanned with CamScanner